आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१९ मे २०२४ - रविवार

राज्यात पाचव्या आणि शेवटच्या टप्प्यात १३ मतदारसंघांमध्ये मतदानाची तयारी पूर्ण झाली आहे. २४ हजार ५७९ केंद्रांवर मतदान होणार आहे. यासाठी ४१ हजार ८९७ बॅलट युनिट्स, २४ हजार ५७९ कंट्रोल युनिट्स आणि व्हीव्हीपॅटची, तसंच मतदान केंद्रांवर नजर ठेवण्यासाठी वेबकास्टिंगची व्यवस्था करण्यात आली आहे. याआधीच्या टप्प्यांमध्ये मतदानाची कमी टक्केवारी पाहता मतदानाचं प्रमाण वाढवण्याचे प्रयत्न निवडणूक आयोग करत आहे. मतदान केंद्रांवर पिण्याचं पाणी, वैद्यकीय मदत, शौचालयं, प्रतीक्षालयं यांची सोय करण्यात आली आहे. मुंबईत दिव्यांग मतदारांसाठी सुमारे ६०० बेस्ट बसची मोफत सेवा उपलब्ध असेल. मतदानाच्या प्रक्रियेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी आवश्यक सुरक्षाव्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

**<><><><><>**

राज्यात एकंदर २६४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. अरविंद सावंत, पियुष गोयल, अमोल किर्तीकर, उज्वल निकम, वर्षा गायकवाड, हेमंत गोडसे, श्रीकांत शिंदे आदी उमेदवार नशीब आजमावत आहेत.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यातल्या भिवंडी, कल्याण आणि  ठाणे या लोकसभा मतदारसंघात एकूण सुमारे ६६ लाख ७८ हजार ४७६  मतदारांना उद्या

२०  मे रोजी मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. तिन्ही लोकसभा मतदारसंघ मिळून सहा हजार ६०४ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. मुरबाड विधानसभा मतदारसंघात जिल्ह्यामध्ये सर्वाधिक ५११  मतदान केंद्रं आहेत. तर सर्वात कमी मतदान केंद्रं उल्हासनगर विधानसभा मतदार संघात २५१  इतकी आहेत.

जिल्ह्यात एकूण १८  मतदान केंद्रं  महिलांद्वारे चालवण्यात येणार आहेत. तसंच १८ मतदान केंद्रं दिव्यांग आणि १८ मतदान केंद्रं ही युवकांद्वारे चालवण्यात येणार आहेत.

जिल्ह्यातल्या एकूण मतदान केंद्रांपैकी तीन हजार ३२५ मतदान केंद्रावर वेबकास्टिंगची सुविधा देण्यात येणार आहे.

नाशिक आणि दिंडोरी मतदारसंघात मतदान यंत्रांचं वितरण सुरू झालं असून संबंधित ठिकाणच्या तहसील कार्यालयातून ती यंत्रे मतदान केंद्रांकडे रवाना होत आहेत. सायंकाळपर्यंत प्रत्येक मतदान केंद्रावर ही यंत्रे पोहोचतील.

नाशिक जिल्ह्यात ४ हजार मतदान केंद्र आहेत. त्यामध्ये दिंडोरीसाठी १९२२ तर नाशिकसाठी १९१० मतदान केंद्र आहेत.

धुळे मतदारसंघात एकूण १ हजार ७०४ मतदान केंद्रांवर सुमारे साडेआठ हजार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदान कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने ११७

बसेस, १०० जीप, दोन बार्ज, ८० क्रूझर, १० ट्रक, २० स्कूलबस अशी एकूण ७५२ वाहने सज्ज केली आहेत.

<><><><>

अनुसूचित जाती प्रवर्गातल्या विद्यार्थ्यांची संख्या २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात ४४ टक्क्यांनी वाढल्याचं राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाच्या अहवालात म्हटलं आहे. २०१४-१५ या वर्षात ४६ लाख विद्यार्थ्यांची नोंदणी झाली होती. तर २०२१-२२ या वर्षात अनुसूचित जाती प्रवर्गाच्या ६६ लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. विशेष म्हणजे या प्रवर्गातल्या विद्यार्थीनींचं प्रमाण ५१ टक्के वाढलं आहे. तर अनुसूचित जमातीच्या विद्यार्थिनींचं प्रमाण ६२ पूर्णांक २ दशांश आणि अल्पसंख्यक समुदायातल्या विद्यार्थीनींचं प्रमाण ४२ टक्के वाढलं आहे.

<><><><>

बंगालच्या उपसागराचा काही भाग, निकोबार बेटे आणि दक्षिण अंदमानच्या समुद्रात नैऋत्य मोसमी पाऊस दाखल झाला असल्याची माहिती भारतीय हवामान विभागानं दिली आहे. येत्या ३१ मे रोजी मोसमी पाऊस केरळात पोहोचेल असा अंदाज आहे

<><><><>

थायलंडमध्ये सुरू असलेल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी पुरुष दुहेरीत विजेतेपद पटकावलं आहे. त्यांनी चीनच्या चेन बो यंग आणि लिऊ यी यांना २१-१५,

२१-१५ असं पराभूत केलं. या भारतीय जोडीने काल चीनच्याच लु मिंग चे आणि तंग काई वेई यांचा उपांत्य फेरीत पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश मिळवला होता.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दोन सामने होणार आहेत. पहिला सामना हा सनरायझर्स हैदराबाद आणि पंजाब किंग्ज यांच्यात दुपारी साडेतीन वाजता हैदराबादच्या राजीव गांधी स्टेडियमवर होणार आहे. पंजाब किंग्ज संघानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. तर दुसरा सामना राजस्थान रॉयल्स आणि कोलकाता नाइट रायडर्स यांच्यात संध्याकाळी साडेसात वाजता गुवाहाटी इथल्या बर्सापारा क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे.

<><><><><>

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रतापराव भोसले यांचं साताऱ्यात भुईंज इथल्या निवासस्थानी आज पहाटे वृद्धापकाळानं निधन झालं. ते नव्वद वर्षांचे होते. प्रतापराव भोसले यांनी भुईंज गावचे सरपंच म्हणून राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. वाई खंडाळा विधानसभा मतदारसंघाचे ते चार वेळा आमदार होते. तसंच सातारा लोकसभा मतदार संघाचे ३ वेळा खासदार म्हणून त्यांनी प्रतिनिधित्व केलं. प्रतापराव भोसले यांची अंत्ययात्रा आज संध्याकाळी ४ वाजता निघणार असून भुईंज इथं देगाव रस्त्यावर त्यांच्या शेतात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होणार आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष

नाना पटोले यांनी  प्रतापराव भोसले यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. प्रतापराव भोसले यांच्या निधनाने सुसंस्कृत, निष्ठावान नेतृत्व हरपलं असल्याचं पटोले यांनी म्हटलं आहे.

**//<><><><><>//**